जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JAN 2024
तरुण भारत

# विद्यापीठात बाबा जोरावर, बाबा फतेह सिंग जयंती साजरी

कोल्हापूर : वीर बाल दिवसानिमित्त बाबा जोरावर सिंग जी आणि बाबा फतेह सिंगजी या 'वीर बाल' यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. 'वीर बाल' यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JAN 2024
सकाळ

# शिव-शाहू चरित्रातून मिळणार दिशा

## शिवाजी विद्यापीठाचे ऑनलाईन अभ्यासक्रम; नव्या वर्षात प्रारंभ

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३१ : छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे जीवनकार्य, विचार सदैव प्रेरणादायी, स्फूर्ती देणारे आहेत. ते जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शिवाजी विद्यापीठ नव्या वर्षात दोन ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू करणार आहे. त्याद्वारे शिव-शाहूंच्या चरित्राचा अभ्यास करून विद्यार्थ्यांना आयुष्यात नवी दिशा मिळविता येणार आहे.

शिव-शाहूंच्या जीवनकार्यात अनेक स्फूर्तीदायक पैलू आहेत. ते जगभरातील विद्यार्थ्यांना अभ्यासता यावेत, या उद्देशाने विद्यापीठाने मॅसिव्ह ओपन ऑनलाईन कोर्स सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकाचा ३५० वा वर्धापनदिन आणि राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृति शताब्दी वर्षाचे औचित्य आहे. 'छत्रपती शिवाजी महाराज जीवन परिचय' आणि 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे जीवन आणि कार्य' असे या अभ्यासक्रमांचे नाव आहे. साधारणतः तीन महिन्यांच्या कालावधीचे हे अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश मिळणार आहे. नव्या वर्षातील शैक्षणिक सत्रात जूनपासून या अभ्यासक्रमांची सुरूवात होणार आहे.

### गुणपत्रिकेवर 'क्रेडिट'

■ साधारणतः दोन आणि चार क्रेडिटचे (श्रेयांक) हे अभ्यासक्रम असणार आहेत. ते पूर्ण केल्यानंतर एमसीक्यू स्वरूपातील परीक्षा दिल्यानंतर विद्यार्थ्यांना क्रेडिट मिळणार आहेत. त्याची नोंद विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर होणार आहे. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांच्या विचारांना नवी दिशा मिळण्यास मदत होणार आहे.

> “ छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनकार्य, विचारांची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी हे अभ्यासक्रम उपयुक्त ठरणार आहेत. त्यातून संशोधनाला देखील चालना मिळणार आहे.
>
> **- डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू

### तज्ज्ञ मांडणार विविध पैलू

छत्रपती शिवरायांनी केलेली स्वराज्याची स्थापना, त्यांची युद्धनिती, अर्थनिती, राष्ट्र उभारणातील योगदान, त्यांच्या राज्याभिषेकाचे महत्त्व, त्यांनी केलेल्या किल्ल्यांची बांधणी, आरमाराची स्थापना, मराठा इतिहास आदींचा अभ्यास विद्यार्थ्यांना करता येणार आहे. राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक, शैक्षणिक, उद्योग, कला-क्रीडा, कृषी, आदी क्षेत्रांतील कार्य आणि योगदान अभ्यासता येणार आहे. या दोन्ही अभ्यासक्रमांतून शिव-शाहूंचे विचार देखील विद्यार्थ्यांना समजून घेता येणार आहेत. त्यासाठी या विविध पैलूंची मांडणी तज्ज्ञ, अभ्यासक, इतिहास संशोधक व्हिडिओच्या माध्यमातून करणार असल्याचे विद्यापीठातील इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JAN 2024
पुढारी

# विद्यापीठात श्रीरंग उमराणी यांची आज प्रकट मुलाखत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ भूगोल विभाग आणि मनोबल व्यसनमुक्ती आणि पुनर्वसन केंद्र संचलित स्नेहसेतू यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार (दि.१) रोजी दुपारी ४ वाजता भाषा भवन सभागृहात ज्येष्ठ समुपदेशक श्रीरंग उमराणी यांची प्रकट मुलाखत होणार आहे. उमराणी 'व्यसनाधिता' या विषयावर संवाद साधणार आहेत. प्रा. शिरीष शितोळे त्यांची मुलाखत घेणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JAN 2024
लोकमत

# राजवर्धन पाटीलचे मल्लखांबमध्ये यश



प्रयाग चिखली : निटवडे (ता. करवीर) येथील राजवर्धन सुरेश पाटील याने शिवाजी विद्यापीठाच्या मल्लखांब संघातून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मल्लखांब मनोरा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. जयपूर राजस्थान येथील सुरेश ज्ञानविहार विद्यापीठातर्फे ही स्पर्धा आयोजित केली होती. त्याला क्रीडा विभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, प्रशिक्षक बापूसाहेब समलेवाले, डॉ. राहुल मगदूम यांचे मार्गदर्शन, तर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रबंधक डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रोत्साहन लाभले.

